# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/078/2021-2023

YEAR : 48) 1st February 2023 ( No. of Pages 12 ) ( No : 02

# जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा सरळ सरळ शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहन वळणाचा प्रश्न आहे

- प्रा.बी.टी.देशमुख

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

### *शासन स्वामित्वाधिकारित धनाचा प्रवाह*

**१.** राज्य यंत्रणा उत्तमरीतीने चालली पाहिजे यासाठी समाजातून धन उभे करण्याचा विधिमय एकाधिकार शासनाकडे असतो. **इतिहासाचा धांडोळा घेतला तर राज्याकडे सर्व मार्गांनी एकत्र होणाऱ्या शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनाचा प्रवाह** हा फक्त काही अल्प जनाकडे (मग त्या कंपन्या असतील, भांडवलदार असतील किंवा कर्ज बुडवणारे व न बुडवणारे उद्योगपती असतील) वळता करावयाचा की, तो अनेक सामान्य माणसांचा समावेश असलेल्या बहुत जनाकडे वळवावयाचा यावरून राज्यकर्त्यांची ओळख ठरते असे दिसून येईल.

### *ब्रिटिश काळातील शासन स्वामित्वाधिकारित धनाचा प्रवाह*

**२.** फार दूर इतिहासात न जाता ब्रिटिश राजवटीपासून सुरुवात करतो म्हटले तर शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या प्रवाह वहनाचे उत्तम वर्णन दादाभाई नौरोजी यांनी केलेले आहे. कच्चा माल पुरविणारा शेतकीप्रधान देश आणि पक्का माल खपवण्याची किफायतशीर बाजारपेठ हेच भारताचे स्वरूप ठेवण्याचा ब्रिटिशांनी सतत प्रयत्न केला. हिंदुस्थानचे हे जे अर्थशोषण होई त्याबद्दल तक्रार करतांना विलायतेतील एका भाषणात दादाभाई नौरोजी म्हणतात : "महंमद गझनीने १८ स्वाऱ्या करून अठराही वेळा हिंदुस्थान लुटला असे इतिहासकार म्हणतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली संपत्तीही तुम्ही (इंग्रज) एका वर्षात लुटून नेता तितकी होऊ शकली नाही. शिवाय त्याने हिंदुस्थानला जी जखम केली ती निदान अठराव्या घावानंतर तरी बंद झाली; पण तुम्ही जे घाव घालता व त्यामुळे जो रक्तपात होत आहे त्याला अंतच नाही. ज्याप्रमाणे ऋतुपरंपरा नियमितपणे चालू असते त्याप्रमाणे आम्ही जगलो किंवा मेलो तरी आम्ही निपजलेल्या धनापैकी तीन कोटी पौंडाचे धन दरसाल देशातून बाहेर धाडलेच पाहिजे. तुमचे हे वैभवशाली साम्राज्य हिंदी लोकांच्या पैशावर व रक्तावर उभारलेले आहे. या रक्तस्त्रावामुळे हिंदुस्थान मृत्युपंथास लागला तर नवल नाही." **दादाभाई नौरोजी यांचे हे उद्‌गार शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहन दिशेवर आधारित आहेत, हे सहज लक्षात येईल.**

### *संस्थानिकांनी केलेला त्या धनाचा वापर*

**३.** भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतात ६०० च्या जवळपास संस्थाने होती. या संस्थानांपैकी कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज किंवा बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांसारख्या काही मोजक्या संस्थानिकांची नावे आपल्याला आजही आठवतात व इतर संस्थानिक हे इतिहासजमा झालेत. **शासन स्वामित्वाधिकारित धनाचा वापर सामान्य जनाच्या हितासाठी करण्याच्या गुणामुळेच आज उत्तरप्रदेश सारख्या दूर प्रांतात शाहू महाराजांचे पुतळे उभारले जातात.**

**कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी** विद्येच्या प्रसाराच्या क्षेत्रात केलेले काम अविस्मरणीय आहे. सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा तर त्यांनी केलाच पण त्यासाठी शासन स्वामित्वाधिकारित धनामध्ये भर घालता यावी म्हणून १६ ऑगस्ट १९१८ रोजी शिक्षण विषयक कराचा कायदा केला. शहरात बोर्डिंगे नसली तर अनेक होतकरू विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा असूनही त्यांना शिक्षण घेणे शक्य होत नाही, हे महाराजांना दिसून आले होते. शाळा-कॉलेजची द्वारे उघडी ठेवली की सर्वांनाच त्यात शिक्षण घेणे जमते असे नाही. कित्येक विद्यार्थ्यांची शहरात राहाण्याची सोय नसते, कित्येकांची गरिबी व जात आडवी येते. सर्व जातींसाठी एक बोर्डिंग काढण्याचा १८९६ साली केलेला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर शाहूमहाराजांनी प्रत्येक जातीची बोर्डिंगे काढण्यास १९०१ सालापासून सुरुवात केली. मागासलेल्या व अस्पृश्य लोकांच्या विद्यावृद्धीसाठी निरनिराळ्या जातींची, उदा. मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी अनाथ बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग, प्रभू बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, अस्पृश्यांचे मिस क्लार्क होस्टेल, मांगांचे बोर्डिंग, रोहिदास बोर्डिंग वगैरे बोर्डिंगे स्थापन केली. **या कामापायी त्यांनी हजारो रुपये खर्च केले.** कित्येक बोर्डिंगास मोठ्याल्या इमारती मोफत दिल्या. कित्येकांना कायमच्या खर्चासाठी शेते दिली. **शिवाय प्रत्येक बोर्डिंगास सालिना ठराविक ग्रँट असे.** मांगांच्या मुलांवर आपली स्वतःची देखरेख असावी म्हणून त्यांनी त्यांचे बोर्डिंग आपल्या स्टेशन बंगल्याला लागून सुरू केले. या बोर्डिंगातील मुलांना पुष्कळदा ते स्वतः शिकवीत आणि उपदेश करीत.

**"सर्व प्रकारच्या समतेचे तत्त्वज्ञान दैनंदिन व्यवहारात रूढ व्हावयाचे असेल, तर त्याला ममतेचा आधार असावा लागतो. 'हा समाज माझा, ही माणसे माझी, यांची सुखदुःखे माझीच आहेत,' असे सतत जाणवल्याशिवाय व्यक्तीच्या हातून उच्च तत्त्वज्ञानाला अनुरूप कृती होणे कठीण.** हा ममतेचा महासागर शाहूमहाराजांच्या अंतःकरणात अष्टौप्रहर हेलावत होता." हे जे वि.स.खांडेकरांनी त्यांच्या विषयी लिहून ठेवले आहे ते उगाच नाही. *(राजर्षी शाहू गौरवग्रंथ, पृष्ठ ३१२)*

**बडोद्याच्या सयाजीराव महाराज गायकवाडांनी** रयतेला सक्तीचे मोफत शिक्षण देण्यासाठीची व्यवस्था त्यांच्या संस्थानात सुरू केली. त्यांनी इसवी सन १८७५ मध्ये स्वतंत्र शिक्षण विभागाची स्थापना करून देशी शाळांची सुरुवात केली, सन १८८२ मध्ये अस्पृश्य, अनाथांसाठी मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण व वसतीगृहे सुरू करून एक पायंडा पाडला. सन १८९२ मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. महाराष्ट्रातील रयत शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, मराठवाडा विद्या प्रसारक शिक्षण संस्था यांसारख्या अनेक संस्थांच्या संस्थापकांना विविध शिष्यवृत्तींच्याद्वारे मदत केली.

**छत्रपती शाहू महाराज किंवा सयाजीराव महाराज गायकवाड यांसारख्या महाराजांची नावे आपल्याला आजही प्रातःस्मरणीय वाटतात, याचे मुख्य कारण शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहनाला त्यांनी लावलेले वळण हेच होय.** या दोनही महाराजांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांशी असलेला ऋणानुबंध सर्वांच्याच माहितीचा विषय आहे. कोल्हापूरपासून दहा मैलांवर माणगाव येथे १९२० साली भरलेल्या हरिजनांच्या परिषदेमध्ये भाषण करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याकडे बोट दाखवून त्यांनी, 'येथून पुढे हाच तुमचा पुढारी' असा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली हरिजनांनी आपल्या मुक्ततेसाठी आणि सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रतिष्ठापनेसाठी आपले आंदोलन चालू ठेवावे असा सल्ला दिला. डॉ.आंबेडकरांचा लंडनमधील अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी तर शाहूमहाराजांनी त्यांना आर्थिक साहाय्य दिलेच; परंतु त्यांच्या चळवळीला जोर यावा म्हणून 'मूकनायक' या पत्राच्या प्रकाशनासाठीदेखील महाराजांनी मोलाची मदत केली.

### *मूलभूत हक्क व राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे*

**४.** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक, राजकीय व आर्थिक हक्कांबाबतचा आग्रह समाजातील सर्व वर्गांकडून होऊ लागला. आमच्या घटनाकारांनी याबाबतची उचित दखल घेतली व महत्त्वपूर्ण अशा सामाजिक व राजकीय हक्कांचा भारतीय

संविधानातील मूलभूत हक्कांमध्ये समावेश केला. मूलभूत हक्कांची न्यायालयामार्फत अंमलबजावणी करवून घेता येते. **आर्थिक हक्कांचा समावेश हा त्यावेळी मूलभूत हक्कांमध्ये करणे शक्य नव्हते** याची मुख्य कारणे दोन होती. एक म्हणजे स्वातंत्र्य नुकतेच मिळालेले असल्यामुळे शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनाचे आकारमान काय असेल याविषयीची मोघम स्थिती व दुसरे म्हणजे आर्थिक हक्क शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनाला झेपणारे नसतील व कोर्टामार्फत त्यांची अंमलबजावणी करून घेता येत नसेल तर त्यांचा मूलभूत हक्कांमध्ये समावेश करून उपयोग काय? यावर आमच्या घटनाकारांनी अतिशय उत्तम मार्ग काढला व तो म्हणजे अशा **महत्त्वपूर्ण आर्थिक हक्कांचा समावेश घटनेच्या चौथ्या म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) या भागामध्ये केला.** "या भागात अंतर्भूत असलेले उपबंध कोणत्याही न्यायालयाकरवी बजावणीयोग्य असणार नाहीत, पण तरीसुद्धा त्यात घालून दिलेली तत्त्वे देशाच्या अभिशासनात मूलभूत आहेत आणि कायदे करताना ही तत्त्वे लागू करणे हे शासनाचे कर्तव्य असेल." अशी व्यवस्था संविधानाच्या ३७ व्या कलमात नमूद आहे. **"कामाचा, शिक्षणाचा अधिकार आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत सरकारी साहाय्याचा अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करणे हे शासनाचे कर्तव्य असेल"** अशी व्यवस्था संविधानाच्या ४१ व्या कलमात नमूद आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत व भावी काळातील संसदेला व विधीमंडळांना तसेच कार्यकारी मंडळाला कारभार करतांना ही घटनासमिती काही निदेश देत आहे असेच या मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप राहील ही गोष्ट मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनासमितीत स्पष्ट केली होती. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"With regard to the word "directive" I think it is necessary and important that the word should be retained because it is to be understood that in enacting this part of the constitution the **Constituent Assembly, as I said, is giving certain directions to the future legislature and the future executive to show in what manner they are to exercise the legislative and executive power which they will have."** *(Constitution Assembly Debates Vol. 7 Page 476)*

### केंद्राचा व राज्याचा संचित निधी

**५.** भारतीय संविधानाने केंद्र व राज्यशासनाचे उत्पन्नाचे स्रोत कोणते असतील हे काटेकोरपणे ठरवून दिलेले आहेत. केंद्र शासनाकडे सर्व मार्गांनी आलेला सर्व निधी भारताचा संचित निधी (Consolidated Fund of India) या नावाच्या एकत्रित निधीमध्ये जमा होईल. प्रत्येक राज्याला त्या त्या "राज्याचा संचित निधी" असेल व त्या राज्याला मिळालेले सर्व उत्पन्न त्या एकत्रित निधीत जमा करावे लागेल. सारांश काय तर केंद्रशासनाकडे किंवा राज्याकडे सर्व मार्गांनी येणारे उत्पन्न त्या त्या संचित निधीमध्येच जमा करावे लागेल अशी तरतूद भारतीय संविधानाच्या कलम २६६ मध्ये आहे. विधानमंडळाने कायदा करून मान्यता दिल्यावरच व दिल्या प्रमाणे शासनाला संचित निधीतून खर्च करता येईल, अशी याच कलमात तरतूद आहे. **संचित निधीमध्ये एकत्रित झालेला हा निधी म्हणजे त्या त्या शासनाचे स्वामित्वाधिकारित धन होय.** कायदा करूनच शासनाला या धनाचा वापर करता येतो असे कायदे करतांना सर्व सामान्यांच्या काही महत्त्वपूर्ण आर्थिक हक्कांना प्राधान्य दिले जावे अशी रास्त अपेक्षा पुढे आली.

### पाच आर्थिक अधिकार

**६. घटना अंमलात आल्यानंतर शासनाने स्वामित्वाधिकारित धनाचा वापर कसा करावा? याबाबतच्या लोकांच्या काही अपेक्षा होत्या.** विशेषतः काही आर्थिक सुविधा ह्या आर्थिक हक्कांच्या स्वरूपामध्ये मिळाव्यात अशी लोकांची रास्त अपेक्षा होती. 'We the People' या Penguin Random House ने प्रकाशित केलेल्या ग्रंथात पहिल्याच क्रमांकावर दिल्ली विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात अनेक वर्षे Professor Emeritus म्हणून कार्य केलेले डॉ.प्रभात पटनाईक (सहलेखक जयती घोष) यांचा For a set of Universal Economic Rights या मथळ्याचा एक प्रबंध प्रकाशित झाला असून त्यामध्ये त्यांनी पाच आर्थिक हक्कांचा उल्लेख केलेला आहे. तो पुढील शब्दातः-

"Let us consider five fundamental, universal economic rights that can be instituted : the **right to food** at an affordable price, the **right to employment** or a living wage in the absence of employment, the right to free, universal, **quality healthcare through a national health service,** the right to free, universal, quality **education** at least until the secondary stage, and the right to adequate non-contributory **old-age pension** and disability benefits." *(P6)*

(१) खाद्यान्य उपलब्धतेचा हक्क (२) रोजगाराचा हक्क (३) आरोग्य सुविधेचा हक्क (४) शिक्षणाचा हक्क (५) वार्धक्य काळात निवृत्ती व्यवस्थेचा हक्क (विकलांगतेच्या आधारासह) असे हे पाच आर्थिक हक्क सांगता येतील. डॉ.प्रभात पटनाईक यांनी मांडलेले हे पाचही आर्थिक अधिकार भारतीय संविधानाच्या भाग चारमध्ये नमूद आहेत.

### कायदेशीर आर्थिक अधिकार

**७.** भारतीय संविधान अंमलात आल्यानंतर त्यातील मार्गदर्शक तत्त्वांच्या मार्गदर्शनाप्रमाणे केंद्र शासनाने व अनेक राज्यांनी यापैकी काही आर्थिक अधिकारांना विधिविधानाचे पाठबळ दिल्यामुळे त्यांना 'कायदेशीर आर्थिक अधिकार' असे स्वरूप प्राप्त झाले. शिक्षण हक्काचा कायदा (Right to Education Act), राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान २००५ (National Health Mission 2005), अन्न सुरक्षेचा कायदा (National Food Security Act), त्या अंतर्गत येणारी प्रधानमंत्री गरीब अन्न कल्याण योजना (PMGKAY), ग्रामीण रोजगाराची हमी देणारा कायदा (Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act, 2005) यांसारख्या विधिविधानांनी या हक्कांना कायदेशीर आर्थिक हक्कांचे स्वरूप प्राप्त झाले. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्याने तर शिक्षणाच्या हक्काला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला गेला.

### संविधानातील ४१ व्या कलमाप्रमाणे वार्धक्यावस्थेत शासन साहाय्याचा अधिकार

**८.** निवृत्तीनंतर आर्थिक हक्क म्हणून "निवृत्तीवेतन व्यवस्था" हा कायद्याने स्थापित केलेला व स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्वात असलेला आर्थिक अधिकार उद्ध्वस्त करण्याचा आज होत असलेला प्रयत्न हा निश्चितच घड्याळाचे काटे उलटे फिरविणारा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात फक्त शासकीय कर्मचाऱ्यांनाच निवृत्तीवेतन व्यवस्था लागू होती. पुढे देशभरातील शिक्षक संघटनांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या खटपटीमुळे शिक्षकांना कालांतराने अनेक राज्यात निवृत्तीवेतन व्यवस्था लागू करण्यात आली. **खरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या ४१ व्या कलमात नमूद केल्याप्रमाणे "वार्धक्यावस्थेत (Old Age) सर्व नागरिकांना शासन साहाय्याचा अधिकार" या ना त्या स्वरूपात लागू होईल असे अपेक्षित होते, पण नव्या पेन्शन योजनेने मात्र हा प्रवास केवळ थांबविला असेच नव्हेतर उलटया प्रवासाला त्यामुळे सुरुवात झालेली आहे. या उलटया प्रवासाची सुरुवात जुन्या पेन्शन योजनेला उध्वस्त करण्याच्या प्रयोगाने झाली** असून त्यामुळेच याबाबतचे तपशीलवार विवेचन पुढील परिच्छेदातून केलेले आहे.

### जुन्या योजनेत पेन्शनची परिगणना

**९.** सुरुवातीला शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी व त्यानंतर सर्व स्तरावरील शिक्षकांच्या संघटनांनी त्रिपदरी संघर्ष करून जुनी पेन्शन योजना ही कायदेशीर आर्थिक हक्क म्हणून प्राप्त करून घेतली होती. आंदोलनाच्या मार्गाचा वापर, वेळोवेळी वेतन आयोगासमोर शास्त्रशुद्ध पद्धतीने कैफियत मांडणे व न्यायालयात दाद मागणे या तीनही मार्गांचा वापर करून अनेक पिढ्यांनी केलेल्या संघर्षानंतर

***सारांश काय तर सेवानिवृत्त लोकांच्या तक्रारी व निवेदने ऐकण्यात शासनकर्त्यांचा कितीतरी वेळ वाया जात होता. त्यामुळे आता 'निवृत्तीवेतनधारक' हे पद गमावून बसलेल्या आणि 'वर्गणीदार' या पदावर बढती मिळालेल्या या व्यक्तीने आपला सेवानिवृत्तीनंतरचा वेळ वाया घालवू नये तर प्रथम अभिनिर्णय अधिकारी, त्यानंतर प्राधिकरण, त्यानंतर न्यायाधिकरण, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हेलपाटे घालण्याच्या कामी हा वेळ खर्च करावा अशी सुविधा या नव्या पेन्शन योजनेच्या कायद्याने उपलब्ध करून दिलेली आहे.***

*(परिच्छेद ३६ पहा)*

हे यश मिळाले. जुन्या पेन्शन योजनेचे हे जे बांधकाम झाले त्यामध्ये शासकीय कर्मचारी व त्यांच्या संघटनांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी केलेल्या एका न्यायालयीन संघर्षाने या योजनेची सुदृढता कायम ठेवण्यास मदत झाली. सेवानिवृत्ती वेतनाचे निर्धारण करण्याच्या सूत्रामध्ये पहिल्या वेतन आयोगापासून व त्यानंतर सतत बदल होत गेले. सुरुवातीला सेवेच्या अंतिम कालखंडातील **सरासरी वित्तलब्धीच्या** (Average Emolument) ३७.५ टक्के (३०/८०) इतके ते निवृत्तीवेतन निश्चित होत असे. त्यानंतर ते ४१.२५ टक्के (३३/८०) करण्यात आले. दिनांक ३१ मार्च, १९७९ पासून त्यामध्ये 'स्लॅब सिस्टिम' सुरू करण्यात आली व ते ४२.८६ टक्के ते ५० टक्के निश्चित व्हायला लागले. चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून ते ५० टक्क्यावर निश्चित झाले.

### *नव्यापेक्षा जुन्यांना दुय्यम वागणूक*

**१०.** वेळोवेळी झालेले हे बदल भावी प्रभावाने लागू केले जात असत. एका तारखेच्या पूर्वी निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना जुनीच व्यवस्था लागू राहत असे व त्या तारखेनंतरच्या निवृत्ती वेतन धारकांना नवी व्यवस्था लागू होत असे. '**पूर्वी निवृत्त झालेले**' व '**आता निवृत्त होणारे**' यांच्यामध्ये भेदभाव केला जात असे. त्याविरुद्ध झालेल्या न्यायालयीन संघर्षात शासकीय कर्मचाऱ्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात उत्तम यश मिळविले. याबाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाने (AIR 1983 Supreme Court 130) दिनांक १७ डिसेंबर १९८२ रोजी १९८० च्या याचिका क्रमांक ५९३९-४१ (डी.एस.नकारा व इतर विरुद्ध केंद्रशासन) या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयातील पहिला परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे आहे.:-

"With a slight variation to suit the context Wolsey's prayer : "had I served my God as reverently as I did my king, I would not have fallen on these days of penury"; is chanted by petitioners in this group of petitions in the Shellian tune : "I fall on the thorns of life I bleed." Old age, ebbing mental and physical prowess, atrophy of both muscle and brain powers permeating these petitions, the petitioners in the fall of life yearn for equality of treatment which is being meted out to those who are soon going to join and swell their own ranks,"

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील हा पहिला परिच्छेद ढोबळमानाने पुढीलप्रमाणे सांगता येईल. "जेवढ्या भक्तीभावाने मी माझ्या राजाची (शासनाची) सेवा केली तेवढ्याच भक्तीभावाने मी ईश्वराची सेवा केली असती तर दुर्दैवाचे हे दशावतार पाहण्याची पाळी माझ्यावर आली नसती. असा जप करण्याची पाळी या याचिकाकर्त्यांवर आलेली आहे. आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये रक्तस्त्राव होत मी काट्याकुट्यावर पडलेला आहे. वयोमानपरत्वे आलेले म्हातारपण, बौद्धिक व शारीरिक क्षमतेमध्ये झालेली घसरण, शरीराचे स्नायू आणि बुद्धी यांना उचित आहाराअभावी लागलेली ओहोटी, अशा स्थितीत हे याचिकाकर्ते न्यायालयासमोर आलेले आहेत. यांचे म्हणणे काय आहे? तर आम्ही अनेक वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेले आहोत तेव्हा आम्हाला आमच्यापेक्षा सेवेत कनिष्ठ असलेल्या व नव्याने सेवेत आलेल्या व येत असलेल्या आमच्या व्यावसायिक बंधुपेक्षा कमी प्रतीची वागणूक दिली जाता कामा नये." मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवाड्यात याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला.

### *आता जुन्यापेक्षा नव्यांना दुय्यम वागणूक*

**११. आता याच्या उलट परिस्थिती आलेली आहे.** आमच्यापेक्षा सेवेत ज्येष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांना, शिक्षकांना पेन्शनबाबत जी वागणूक दिली जात आहे त्यापेक्षा वेगळी वागणूक २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना का दिली जात आहे? अशा प्रकारचा सवाल २००५ नंतर भरती झालेल्या शिक्षकांतर्फे व कर्मचाऱ्यांतर्फे उपस्थित करण्यात येत आहे व त्याला कोणतेही समाधानकारक उत्तर शासनाकडून देण्यात येत नाही.

### *पेन्शनचे उद्दिष्ट काय ?*

**१२.** सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त निर्णयाच्या परिच्छेद १९ मध्ये काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

"19. **What is a pension? What are the goals of pension? What public interest or purpose,** if any, it seeks to serve? If it does seek to serve some public purpose, is it thwarted by such artificial division of retirement pre and post a certain date? We need seek answer to these and incidental questions so as to render just justice between parties to this petition."

मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नांची उत्तरे स्वतःच दिली असून ती त्या निर्णयाच्या परिच्छेद २० मध्ये नमूद आहे. तो परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"20. **The antiquated notion of pension being a bounty, a gratituous payment depending upon the sweet will or grace of the employer not claimable as a right and, therefore, no right to pension can be enforced through Court has been swept under the carpet by the decision of the Constitution Bench** in Deoki Nandan Prasad v. State of Bihar, 1971 (Supp) SCR 634 : (AIR 1971 SC 1409) wherein this Court authoritatively ruled that pension is a right and the payment of it does not depend upon the discretion of the Government but is governed by the rules and a Government servant coming within those rules is entitled to claim pension. **It was further held that the grant of pension does not depend upon any one's discretion.** It is only for the purpose of quantifying the amount having regard to service and other allied matters that it may be necessary for the authority to pass an order to that effect but the right to receive pension flows to the officer not because of any such order but by virtue of the rules. This view was reaffirmed in State of Punjab & Anr. v. Iqbal Singh, (1976) 3 SCR 360 : (AIR 1976 SC 667)."

### *"आता निवृत्त होणारे" व "पूर्वी निवृत्त झालेले"*

**१३.** पाचव्या वेतन आयोगाने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १२७.३ ते १२७.६ या चार परिच्छेदात मा.सर्वोच्च न्यायालयाचा नकारा प्रकरणातील उपरोक्त निर्णय आवश्यक त्या तपशीलांसह उधृत केलेला असून परिच्छेद १२७.६ मध्ये पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे. :-

"127.6 We would like, therefore, to state at the outset that we respect the observations of the Hon'ble Court in the Nakara case. **It needs to be averred emphatically that pension is not in the nature of alms being doled out to beggars. The senior citizens need to be treated with dignity and courtesy befitting their age.** Pension is their statutory, inalienable, legally enforceable right and it has been earned by the sweat of their brow. As such it should be fixed, revised, modified and changed in ways not entirely dissimilar to the salaries granted to serving employees."

पाचव्या वेतन आयोगाने याबाबतच्या व्यवस्थेमध्ये बरेच बदल केले. ५० टक्क्यांचा नियम कायम ठेवला, मात्र "**आता निवृत्त होणारे**" व "**पूर्वी निवृत्त झालेले**" या दोघांच्याही बाबतीत कशाच्या ५० टक्के? याबाबतच्या व्याख्या स्पष्ट केल्या. आता जे निवृत्त होतात, त्यांना "निवृत्त होतानाच्या अंतिम कालखंडात जी "**सरासरी वित्तलब्धी**" असेल, (कदाचित त्या वेतनश्रेणीत ती बरीच वरची किंवा सर्वात वरची असू शकेल) त्याच्या ५० टक्के" याला त्यांनी '**पूर्ण समतुल्यता**' (Complete Parity) असे म्हटले आहे, तर "पूर्वी निवृत्त झाले त्यांना ते ज्या वेतनश्रेणीत निवृत्त झाले त्या वेतनश्रेणीच्या समतुल्य नव्या वेतनश्रेणीच्या सुरुवातीच्या किमान तळपातळीच्या ५० टक्के" याला त्यांनी "**सुधारित समतुल्यता**" (Modified Parity) असे म्हटले आहे.

### *"पूर्ण समतुल्यता" व "सुधारित समतुल्यता"*

**१४.** सेवानिवृत्तांसाठी आपल्या अहवालात मांडलेला "**पूर्ण समतुल्यता**" व "**सुधारित समतुल्यता**" हा विचार आम्ही सिद्धान्त म्हणून मांडण्याचे ठरविले आहे, असे प्रतिपादन पाचव्या वेतन आयोगाने केले आहे. पुढचे पुढचे वेतन आयोग लागू होत असतांना त्यावेळीसुद्धा सेवानिवृत्ती वेतनाच्या निर्धारणासाठी "मार्गदर्शक तत्त्व" म्हणून आमचा हा सिद्धान्त उपयोगी पडेल असे मोठे जोरदार समर्थन पाचव्या आयोगाने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १३७.२१ मध्ये केलेले आहे. ते पुढील शब्दातः-

***Pensioner हा शब्द या संपूर्ण कायद्यामध्ये एकाही ठिकाणी वापरण्यात आलेला नाही, कोठेही नाही. आपण ज्याला निवृत्तीवेतनधारक म्हणतो त्याला या कायद्याने 'वर्गणीदार' असे संबोधिले असून दुसऱ्या कलमामध्ये त्याची व्याख्या नमूद करण्यात आलेली आहे.***

*(परिच्छेद ३१ पहा)*

"137.21 **The Commission has decided to enunciate a principle for the future revision of pensions to the effect that complete parity should normally be conceded up to the date of last pay revision and modified parity (with pension equated at least to the minimum of the revised pay scale) be accepted at the time of each fresh pay revision.** This guiding principle which we have accepted would assure that past pensioners will obtain complete parity between the pre-86 and post-86 pensioners but there will be only a modified parity between the pre-96 and post-96 pensioners. The enunciation of the principle would imply that at the time of the next pay revision say, in the year 2006, complete parity should be given to past pensioners as between pre-1996 and post-1996 and modified parity be given between the pre-2006 and post-2006 pensioners. (emphasis supplied)"

## वैचारिक संघर्षाचा विषय

**१५. शेवटी हा आता वैचारिक संघर्षाचा विषय झालेला आहे.** शासनाच्या स्वामित्वाधिकारीत धनाचा प्रवाह हा फक्त काही मोजक्या कंपन्या, काही मोजके भांडवलदार अथवा काही कर्ज बुडविणारे किंवा न बुडविणारे उद्योगपती यांच्याकडे वळवायचा पूर्व पक्षाचा निर्धार असून अनेक सामान्य व्यक्तींचा समावेश असलेल्या बहुत जनाकडे तो वळविला पाहिजे हा उत्तर पक्षाचा विचार. या दोन विचारांमधील हा संघर्ष आहे.

### THE FIGHT IS BETWEEN THE TOP 1 PERCENT AND THE REMAINING 99 PERCENT

**१६.** चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या संघर्षाच्या वेळी ज्यांनी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे (AIFUCTO) अध्यक्ष या नात्याने त्या अखिल भारतीय संघर्षाचे यशस्वी नेतृत्त्व केले ते शिक्षक चळवळीतील ज्येष्ठ नेते डॉ.किशोर ठेकेदत्त यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी याबाबत एक परिपत्रक प्रसिद्ध केले असून त्या परिपत्रकातील सुरुवातीचे पाच लहान लहान परिच्छेद पुढीलप्रमाणे आहेत.:-

"CCTOB Nov 18,2022 **: Ideological Struggle :** Dear Pension Fighters, We must congratulate the Maharashtra Rajya Juni Pension Sanghatana for their novel and effective way of pressing for the Old Pension Scheme.

Yesterday, Nov 17, a large number from the Sanghatana joined the Bharat Jodo Yatra from Patur in Akola district and marched along with Shri Rahul Gandhi for the whole day.

**It is very important that this issue has been raised with one of the most influential leaders of the Congress. Our demand for the OPS has been accepted by the Congress Party, as Shri Mallikarjun Kharge the Congress President had declared in Haryana recently.**

This commitment at the central level is very important for us. However, let us not forget that our enemies are also active against us.

**The corporate capitalists as a class are against the OPS. This is seen from their mouthpiece the Indian Express, which recently wrote an editorial against the OPS. On November 14,** the paper carried a piece by Arvind Panagariya, Narendra Modi's blue-eyed boy, who argued that it was a "sin" to promise the OPS because the future state government will have to bear the burden when those who were appointed in 2004 retire in 2034."

या वैचारिक संघर्षाचे वर्णन त्यांनी आपल्या या परिपत्रकात **"Old Pension Scheme (OPS) The fight is between the top 1 percent and the remaining 99 percent"** या मथळ्याने केलेले आहे. डॉ.किशोर ठेकेदत्त यांचे हे संपूर्ण परिपत्रक सन २०२२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २८८ वर प्रसृत करण्यात आलेले असून ते संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावरून कोणालाही दोन मिनिटात उपलब्ध होईल. (सन १९९५ पासून तर सन २०२३ पर्यंतची सर्व वर्षांची नुटा बुलेटीनची सर्व पृष्ठे www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून या विवेचनात बुलेटीनचे वर्ष व पृष्ठ क्रमांक असा त्याचा उल्लेख होईल.)

### ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

(Regd. Under Act XXI of 1860)

404, Devkunj Apartment, Road No :- 06, North Patel Nagar (Near Baba Chowk), P.O. :- Keshri Nagar, Patna-800024 : Mobile : + 91 - 9431617320 /+91 - 9525622524, E-mail :akancphy@gmail.com/aifucto.generalsecretary@gmail.com; Website : www.aifucto.org

**Press Release:Patna /New Delhi**

**Dated: 12.01.2023**

**Entry of Foreign Universities :A blow to constitution. AIFUCTO decides Black badge protest program across the country on 14th Feb,2023.**

The draft regulations on entry of foreign universities is a serious blow to the educational ethics enshrined in our constitution. The policy will harm, dilute and destroy public funded higher education system of country making road for higher education more corporatized and marketized. The retrograde decision is a shattering blow to our inclusive system of education. The policy of reservations and the principle of social justice will find a natural death. The proposed red carpet treatment at the cost of our state/central universities will also have serious repercussions on the souvenir status and distinct plural cultural identity of our nation.

AIFUCTO National Executive Body met in virtual mode in the dangerous background and decided to retaliate with united force.AIFUCTO is critical of mindless reform proposals by the government of India with a retrograde and undemocratic mind set. Neither the views of all the stake holders including AIFUCTO was heard nor our open suggestions in prayer, petition and protest have been accepted. **NEP2020,we feel ,is an imposition on the collective wisdom of the nation.** AIFUCTO has been constantly opposed many of the reform program in the sphere of higher education such as blending mode of learning /teaching system, four years under graduate program, academic bank of credit,dual degree, multiple entry /, exit,,common universities entrance test etc.The last nail in the coffin of public funded higher education systems is the draft regulations on entry of foreign universities and the proposed National Digital University and Higher Education Commission.

AIFUCTO being disillusioned and dissatisfied with the attitude of central government and their determination to ignore the constitutional value of education has decided to intensity the struggle. **In the first step there will be country wide black badge protest by the members against all mindless educational reforms on 14th February 2023.**

**AIFUCTO also reiterate its demand for restoration of old pension scheme,** filling of all vacancies in teaching and non- teaching and regularisation of services of ad hoc and contract teachers across the country.

**If central Government did not respond our protest and democratic voice, the plan and program for a bigger and more united struggle will be decided in the academic conference schedule to be held at Kurukshetra University, Harayana from 17th March to 19th March 2023 to Save Education, Save Campus and Save Nation.**

Kind request for publication

**Prof Kesab Bhattacharya,** *President* **Prof.Arun Kumar,** *General Secretary*

### *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा धोरणात्मक निर्णय*

**१७.** जुनी पेन्शन योजना रद्द होणे हे सर्वच व्यावसायिकांवर आलेले एक मोठे संकट आहे व ते सर्व शक्तीनिशी परतवून लावण्याच्या प्रयत्नात कर्मचाऱ्यांच्या संघटनांच्या सोबत सहभागी झाले पाहिजे **असा धोरणात्मक निर्णय अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व या महासंघाच्या घटक संघटनांनी घेतला आहे.** दिनांक ५ जून २०२२ रोजी झालेल्या नुटाच्या आमसभेत विषय क्रमांक ८३२ अन्वये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ८ मे २०२२ रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक ६ अन्वये याबाबत संमत झालेल्या ठरावाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचा सात परिच्छेदांचा हा ठराव सन २०२२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १२७ वर प्रसृत करण्यात आलेला आहे. त्यातील ७ वा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे. :-

"नवीन पेन्शन योजना नाकारून जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी एकत्र होऊन संघर्ष करणे आवश्यक आहे, असे या कार्यकारी मंडळाचे मत आहे. **यासाठी नवीन पेन्शन योजना संपुष्टात आणून त्याबाबतचा शासननिर्णय रद्द करण्यात यावा आणि जुनी पेन्शन योजना लागू व्हावी ही एकच मागणी समोर ठेवण्यात यावी.** सन २००५ चा निर्णय हा राज्यशासनाने घेतलेला निर्णय असल्यामुळे तो निर्णय राज्यशासनच रद्द करू शकते. ही गोष्ट लक्षात घेता **सर्व स्तरावरचे शासकीय कर्मचारी, अधिकारी व शिक्षक यांनी एकत्रितरीत्या या संघर्षामध्ये एकच मागणी समोर ठेऊन संघर्ष करावा अशी सर्व संघटनांना विनंती करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सर्व घटक संघटनांनी या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत राहण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**"

### *राजस्थान शासनाच्या निर्णयाचे स्वागत*

**१८.** राजस्थान सरकारने जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे सर्व स्तरावरचे कर्मचारी व शिक्षक यांनी त्या घोषणेचे मनापासून स्वागत केले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांडे व सरकार्यवाह डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२२ रोजी पत्रक काढून या घोषणेचे स्वागत केले. त्यांचे हे पत्रक सन २०२२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७३ वर प्रसृत केलेले आहे. या पत्रकाची सुरुवातच पुढीलप्रमाणे आहे. :- "राजस्थान सरकारने आपल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १ जानेवारी २००४ नंतर सरकारी नोकरीत लागलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन लाखो कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. मा.मुख्यमंत्री श्री.अशोक गेहलोद यांनी स्वतः या निर्णयाची घोषणा केली."

याच पत्रकात पुढे असे नमूद केलेले आहे की,

"नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती योजनेची कार्यप्रणाली ही सरकारी कर्मचाऱ्यांच्या हिताची नाही. भांडवलीकरणाच्या व्यवस्थेतील बाजाराच्या जोखमीवर आधारित ही योजना सरकारी कर्मचाऱ्यांना फारशी हितावह नाही. हे माहित असूनही महाराष्ट्र सरकारने ही योजना २००५ नंतरच्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या माथी थोपविली आहे. विविध स्तरामधून आणि विविध संघटनांच्या पातळीवर सातत्याने या योजनेला विरोध होत आलेला आहे. एमफुक्टो या प्राध्यापक संघटनेनेही सुरुवातीपासूनच विविध मोर्चे, धरणे, आंदोलने आणि निवेदनांच्या माध्यमातून डीसीपीएस योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केलेले आहे." या पत्रकाच्या शेवटी महाराष्ट्र शासनाला पुढीलप्रमाणे विनंती करण्यात आलेली आहे. :-

"राजस्थान सरकारने आपल्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा जो विधायक निर्णय घेतला त्याबद्दल एमफुक्टो संघटनेचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांडे, सरचिटणीस डॉ.प्रवीण रघुवंशी तसेच एमफुक्टोचे समस्त कार्यकारी मंडळ यांनी राजस्थान सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. तसेच राजस्थान सरकारच्या निर्णयाप्रमाणेच महाराष्ट्र सरकारने देखील सकारात्मक निर्णय घेऊन राज्य कर्मचारी यांना २००५ पूर्वीची जुनी पेन्शन योजना लागू करावी असे महाराष्ट्र सरकारला आवाहन केले आहे."

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने ८ जानेवारी २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये (१) परदेशी विद्यापीठांची घुसखोरी (२) नवीन शैक्षणिक धोरण व (३) नवीन पेन्शन बाबतच्या धोरणाविरोधात कृतिकार्यक्रमाचे नियोजन केले असून त्याअंतर्गत देशभर दिनांक १४ फेब्रुवारी रोजी

## देशव्यापी काळी फित आंदोलन

(country wide black badge protest)

आयोजित केलेले आहे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह यांनी काढलेले याबाबतचे १२ जानेवारी २०२३ रोजीचे परिपत्रक सोबत प्रसृत केलेले आहे. १४ तारखेच्या या आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे, अशी विनंती आहे.

| | |
|---|---|
| **(डॉ. एस. पी. लवांडे)** | **(डॉ. पी.बी.रघुवंशी)** |
| *अध्यक्ष* | *सचिव* |

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

### RAJASTHAN IMPLEMENTS OLD PENSION SCHEME A HISTORIC, HUMANE DECISION

**१९.** राजस्थान विधिमंडळाच्या अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतची घोषणा केल्यानंतर राजस्थान सरकारने त्याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केला. पुढे देशभर राष्ट्रीय वृत्तपत्रांमधून याबाबतची माहिती देणाऱ्या जाहिराती अधिकृतपणे राजस्थान सरकारच्या (#Rajasthan_NPS20PS) Department of Information and Public Relations : Government of Rajasthan या खात्याच्या वतीने प्रकाशित करण्यात आल्या. **"Government of Rajasthan : Ashok Gehlot : Chief Minister, Rajasthan"** असा या जाहिरातीचा मथळा असून जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा जो ऐतिहासिक व मानवी निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती या जाहिरातीमध्ये पुढील शब्दात देण्यात आलेली आहे. :-

**"Rajasthan implements Old Pension Scheme A Historic, Humane Decision :** A major step towards Employee Welfare and Development of the State • Rajasthan Government in its 2022-23 Budget has announced to implement the Old-Pension Scheme (PS) for all government employees appointed on or after 1 January, 2004. Under this, employees will get benefits like pension/family pension, gratuity and commuted pension amount, making them much stronger socio-economically. • **10% monthly salary deduction under NPS has been stopped and employees are getting increased salary from 1 April 2022.** • Additionally, amount remaining after adjustment of Pensioner Medical Fund (RGHS) from salary deduction will be given with interest on GPF upon retirement."

अनेक कर्मचाऱ्यांनी व शिक्षकांनी ही जाहिरात नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करावी अशी विनंती केल्यावरून त्या जाहिरातीतील पानभर मजकूर सन २०२२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १३४ वर प्रकाशित करण्यात आलेला आहे.

### SHORTCOMINGS OF NEW PENSION SCHEME

**२०.** नवीन पेन्शन योजनेमध्ये (NPS) काय दोष आहेत? याबाबतची तपशीलवार माहिती राजस्थान सरकारच्या या अधिकृत जाहिरातीमध्ये देण्यात आलेली आहे. त्याबाबतचा मजकूर पुढीलप्रमाणे :-

ता.क. :- 'नुटा बुलेटीन' पाक्षिक म्हणून नोंदबद्ध झालेले नियतकालिक असून पोस्टाच्या परवान्यातील अटीनुसार दर महिन्याच्या १ तारखेला किंवा १५ तारखेलाच त्याचे पोस्टींग करावे लागते. वास्तविक जुन्या पेन्शन योजनेबाबतचे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे व 'नुटा'चे धोरणात्मक निर्णय हे बरेच पूर्वी झालेले आहेत. अमरावती व नागपूर मतदार संघातील विधानपरिषद निवडणूकी संदर्भातील निर्णय १४ जानेवारी रोजीच्या 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाच्या नियोजित बैठकीत होऊन १५ जानेवारीला नियोजित बुलेटीन - **संबंधितांचे निर्णय खूपच विलंबाने झाल्याने** - प्रकाशित करता आले नाही, हे खेदाने नमूद करण्यात येत आहे. आणखी असे की जुन्या पेन्शन योजनेबाबत कोणत्याही राज्यशासनाने शासननिर्णय काढला नाही, असा एक प्रचार केला जात आहे. तो खरा नाही. सन २०२२ च्या नुटा बुलेटीनच्या (१) पृष्ठ १२९ वर छत्तीसगड शासनाचा (२) पृष्ठ १३४ वर राजस्थान शासनाचा (३) पृष्ठ २८९ वर पंजाब शासनाचा व (४) २०२३ च्या पृष्ठ २० वर हिमाचल प्रदेश शासनाचा निर्णय प्रसृत करण्यात आलेला आहे. (५) गोवा या राज्यात निर्णय झाल्याचे तेथील शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे पत्रक २०२२ च्या पृष्ठ १३७ वर प्रसृत करण्यात आलेले आहे. - **डॉ.प्रवीण रघुवंशी,** ***अध्यक्ष, नुटा***

**"Shortcomings of New Pension Scheme :**

• No guarantee of pension. Mandatory 10% contribution by employee.

• National Human Rights Commission has asked Govt. of India to set up Committee for review of NPS for safeguarding human rights of employees.

• Second National Judicial Pay Commission has recommended that NPS should not be implemented for Judicial Services.

• Kerala, Andhra Pradesh, Himachal Pradesh and Punjab have set up committees to review NPS.

• The New Pension Scheme was not implemented for Armed Forces. This clearly shows that the Old Pension Scheme provided sufficient social security to these employees.

• CAG has revealed shocking facts about implementation, planning and monitoring of NPS :

• Even after 15 years from introduction of NPS, rules on service conditions/retirement benefits in respect of employees covered by NPS are still pending for finalisation.

• There is neither any indication whether actuarial evaluation of the Scheme was conducted once in 2 years, nor has there been adoption of any other mechanism to assess the viability of the Scheme.

• Assurance on 100% coverage of eligible employees is still lacking in the Scheme.

**ADVANTAGES OF THE OLD PENSION SCHEME**

**२१.** जुन्या पेन्शन योजनेचे काय फायदे आहेत? याविषयीची तपशीलवार माहिती राजस्थान शासनाच्या या अधिकृत जाहिरातीमध्ये देण्यात आलेली असून त्याबाबतचा मजकूर पुढीलप्रमाणे आहे. :-

**"Advantages of the Old Pension Scheme**

• Pension Guarantee : Employee gets 50% of the last monthly salary as pension every month.

• Employee does not have to pay any contribution.

• Dearness relief for securing employees against inflation.

• Commutation of pension up to 33%."

**POSITIVE IMPACT OF OPS ON STATE's DEVELOPMENT**

**२२.** जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे राज्याच्या विकासावर काय सकारात्मक परिणाम होतील? याची माहिती या जाहिरातीमध्ये देण्यात आली असून त्याबाबतचा मजकूर पुढीलप्रमाणे :-

**"Positive Impact of OPS on State's Development**

• More meritorious and talented candidates will apply for new vacancies.

• Personnel will be more motivated towards work, leading to good governance.

• Implementation of old pension scheme will not result in deduction of even a single rupee from development expenditure of the state and welfare of its people."

***दरमहा १४८.१७ रुपये पेन्शन निश्चित झाले***

**२२.** राजस्थानात जानेवारी २००४ मध्ये नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आली होती. एप्रिल २०२२ मध्ये पुन्हा जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली. या मधल्या काळात NPS मध्ये सेवानिवृत्त झालेल्या २७०१ व्यक्तींपैकी २११८ व्यक्तींचे तपशील माहितीच्या अधिकारात मिळविण्यात आलेले आहेत. त्यात असे आढळून आले की, १२ व्यक्तींना मिळालेले निवृत्तीवेतन हे ५०० रुपयांपेक्षा कमी होते. गंगानगर जिल्ह्यातील निर्मला शर्मा या सेवानिवृत्त व्यक्तीला **दरमहा १४८.१७ रुपये पेन्शन निश्चित झाले.** माहितीच्या अधिकारात अधिकृतरीत्या प्राप्त झालेली ही माहिती टाईम्स ग्रुपचे सिद्धार्थ दत्ता यांनी एका प्रसारणाद्वारे प्रसृत केली असून ते प्रसारण शब्दशः पुढीलप्रमाणे आहे. :-

**"Under NPS, 12 got between Rs. 100 and Rs. 500, lowest Rs. 148.17**

Siddhartha.Dutta@timesgroup.com

(OPS) was implemented in Rajasthan in April this year.

**Jaipur :** In all, 12 persons received pension in the range of Rs. 100-Rs.500, lowest being Rs. 148.17 monthly, out of 2,701 retired employees who got pension under the New Pension Scheme (NPS) in Rajasthan, an RTI reply received from the State Insurance & Provident Fund (SIPF) department has revealed.

The New/National Pension Scheme was launched **in January 2004.** According to the RTI reply, one Nirmala Sharma of Ganganagar district received Rs. 1,778 annually (Rs. 148.17 monthly). Out of 2,701 pensioners, details of 2,118 were received from the department.

According to the reply,

405 persons got pension amount in the range of Rs. 501-1000;

475 received pension amount in the range of 1001-1500;

386 persons in the range of Rs. 1501-2000;

292 pensioners in the range of Rs. 2001-2500;

213 in the range of Rs. 2501-3000;

124 persons in the range of Rs. 3001-3500;

90 pensioners in the range of 3501-4000;

42 in the range of Rs. 4001-4500;

21 persons in the range of Rs. 4501-5000;

13 in the range of Rs. 5001-5500;

6 pensioners in the range of Rs. 5501-6000;

5 got pension amount in the range of Rs. 6001-6500;

6 in the range of Rs. 6501-7000;

5 in the range of Rs. 7001-7500;

2 persons got pension amount in the range of Rs. 7501-8000;

5 in the range of Rs. 8001-8500;

2 in the range of Rs. 8501-9000."

***शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनामध्ये वृद्धी कशी करता येईल?***

**२३.** 'We the People' या Penguin Random House ने प्रकाशित केलेल्या ग्रंथात पहिल्याच क्रमांकावर दिल्ली विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात अनेक वर्षे Professor Emeritus म्हणून कार्य केलेले डॉ.प्रभात पटनाईक (सहलेखक जयती घोष) यांचा For a set of Universal Economic Rights या मथळ्याचा जो प्रबंध प्रकाशित झाला त्याचा उल्लेख वर परिच्छेद ६ मध्ये केलेला आहे. पेन्शनसह या आर्थिक हक्काची कायदेशीर हक्क म्हणून पूर्तता करण्यासाठी **शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनामध्ये वृद्धी कशी करता येईल?** याबाबतचा त्यांच्या प्रबंधातील उल्लेख नोंद घेण्यासारखा आहे. तो पुढीलप्रमाणे:-

"According to the Global Wealth Migration Review 2019, the total net worth of private individuals in India in 2018 amounted to Rs 570 lakh crore. Of this amount,

***घटनात्मक पदधारक या महावस्त्रासह सर्व सत्ताधारक श्रेष्ठजन जुनी पेन्शन योजना हितकारक असल्यामुळे त्या योजनेचा सुखोपभोग घेतांना आपल्या सर्व सेवकांना मात्र नव्या पेन्शन योजनेच्या गर्तेत ढकलून देत असतील तर ''प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्'' हा सिद्धांत सांगणारी संसद भवनातील पाटी काढून टाकावी लागेल. लोक उदासीन असतील तरच व तोपर्यंतच अशा राज्यकर्त्यांना सुखासीन राहता येते हा सिद्धांतसुद्धा राज्यकर्त्यांना विसरता येणार नाही.***

*(परिच्छेद २१ पहा)*

the top 1 per cent owns 58 per cent or around Rs 330 lakh crore." *(P11)*

"A 2 per cent tax on the wealth of just this stratum will fetch Rs 6.6 lakh crore per annum..... Wealth taxation has to be supplemented by inheritance taxation...... If we assume that every year 5 per cent of the total wealth of this top stratum gets transferred to their children, or other legatees, as inheritance, then even a modest taxation of one- third on such inheritance would fetch Rs 5.5 lakh crore. **Just these two taxes, in short, and that too levied only on the top 1 per cent, would be quite enough to fetch more than Rs 12 lakh crore."** *(P11,12)*

## *राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर शासन स्वामित्वाधिकारित धनाचा डोंगर उभा करता येऊ शकतो*

**२४. राजस्थान सरकारने जुनी पेन्शन योजना लागू केली. मग त्यांनी निधी कोठून आणला? याबाबतची सुद्धा माहिती नमूद करणे आवश्यक आहे. केंद्रशासनाजवळ व राज्यशासनाजवळ शासन स्वामित्वाधिकारित धनात भर घालण्याचे अनेक मार्ग उपलब्ध असतात.** भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेल्या रोजगाराची हमी या आर्थिक हक्काला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्रामध्ये ज्या मार्गाचा वापर केल्या गेला, तो लक्षात घेतला म्हणजे **राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर शासन स्वामित्वाधिकारित धनाचा केवढा मोठा डोंगर उभा करता येऊ शकतो हे लक्षात येते.** अमूक एका उपायाचा विचार करावा यासाठी उपरोक्त उदाहरणे सुचविलेली नाहीत. आज काळ पुष्कळ पुढे गेलेला आहे. यावर अनेक उपाय सुचविता येण्यासारखे आहेत. त्यावर चर्चाच करावयाची नाही व NPS सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या बोकांडी बसविण्याचा एकतर्फी निर्धार केलेल्या शासनकर्त्यांना कोण उपाय सूचवेल? व त्यावर कोण विचार करेल? शास**न स्वामित्वाधिकारित** धनात भर घालण्याच्या सर्व उपायांचा विचार करून राजस्थानचे मुख्यमंत्री "Implementation of old pension scheme will not result in deduction of even a single rupee from development expenditure of the state and welfare of its people." असे राष्ट्रीय वृत्तपत्रातून शासनातर्फे अधिकृत जाहिराती देऊन आश्वासित करतात त्याचे मर्म आमच्या शासनकर्त्यांनी ध्यानात घेण्यासारखे आहे.

## *महाराष्ट्रात रोजगाराची हमी देणारा कायदा*

**२५.** महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचा उल्लेख वर आलेलाच आहे त्याबाबत थोडी माहिती देणे मला आवश्यक वाटते. तत्कालीन विधानपरिषदेचे सभापती श्री.वि.स.पागे, उपसभापती श्री.रा.सु.गवई यांच्या पुढाकाराने व श्री.वसंतरावजी नाईक, यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली तयार झालेल्या या योजनेने ग्रामीण भागातील काम करणाऱ्या प्रत्येकाला काम मिळण्याची कायदेशीर हमी प्रदान केली होती. मराठी विश्वकोषाच्या पंधराव्या भागात पृष्ठ १०१ वर याबाबतची तपशीलवार माहिती उपलब्ध आहे. त्यातील पहिलाच परिच्छेद मी शब्दशः उधृत करीत आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"**रोजगार हमी योजना** : उत्पादनक्षम, काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येक बेकार व्यक्तीला रोजगाराची शाश्वती किंवा हमी देणारी महाराष्ट्र शासनाची एक अभिनव योजना. **भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वे या भागात सर्वांसाठी रोजगार हमीची तरतूद करून भारतात आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची जबाबदारी शासनावर सोपविण्यात आलेली आहे.** या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये रोजगार हमी योजना राबविण्यास प्रारंभ केला आणि २६ जानेवारी १९७९ रोजी हिच्यासंबंधीचा अधिकृत कायदा करून या योजनेला मूर्त स्वरूप दिले."

## *महाराष्ट्राची योजना केंद्राने स्वीकारली*

**२६.** ग्रामीण भागातील रोजगारक्षम व्यक्तीला रोजगाराची कायद्याने हमी देणारा जो उपरोक्त कायदा महाराष्ट्रामध्ये करण्यात आला त्याचे अनेक राज्यांनी अनुकरण केले. **त्यावेळेला सुद्धा सर्व सक्षम लोकांना कायद्याने रोजगाराची हमी दिली तर राज्य दिवाळखोरीत निघेल असे म्हणणारे लोक होते.** पण तरीही महाराष्ट्रातील नेत्यांनी आग्रहपूर्वक ती योजना अंमलात आणली. पुढे अनेक राज्यांनी त्या किंवा तत्सम योजनेचा स्वीकार केला. ५-२५ वर्षात अशी व्यवस्था केंद्रस्तरावर का होऊ शकत नाही? याबाबतची चर्चा सुरू झाल्यानंतर केंद्रशासनाने सुद्धा याबाबतचा "Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act, 2005" हा कायदा केला. केंद्राच्या या कायद्याने ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणारा 'कायदेशीर आर्थिक हक्क' उपलब्ध झालेला आहे. या हक्काची न्यायालयातून अंमलबजावणी करवून घेता येते. (Justiciable Right) या हक्काचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. :- **रोजगार नसलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्याने मागणी केल्यास काम दिले पाहिजे, शासनाला असे काम १५ दिवसात देता आले नाही तर त्याला बेरोजगार भत्ता दिला पाहिजे असे या कायद्यात नमूद आहे.** या योजनेच्या अधिकृत संकेतस्थळावरून (MGNREGA website) २०१८-१९ या वर्षात ८ कोटी लोकांना काम मिळाल्याचे दिसून येते. महाराष्ट्राने पुढाकार घेतलेली ही योजना केंद्राच्या पातळीवरसुद्धा स्थापित झाली ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. शासनकर्त्यांची इच्छा असल्यास, जुन्या पेन्शन योजनेचा अस्तित्वात असलेला 'कायदेशीर आर्थिक हक्क' मोडीत काढण्याचे अपकृत्य उध्वस्त करून जुनी पेन्शन योजना पुनरुज्जीवीत करण्याचे श्रेय महाराष्ट्राच्या शासनकर्त्यांना घेता येऊ शकेल.

## *संरक्षण दलांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील*

**२७. संरक्षण दलांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील :** मुळामध्ये या नवीन पेन्शन योजनेबाबत एवढा तीव्र असंतोष असतांना शासन ती रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणताही निर्णय घेत नाही त्यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. खरे म्हणजे ही नवीन पेन्शन योजना म्हणजे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शेअर मार्केटच्या तोंडात ढकलण्यासारखा प्रकार आहे. याची जाणीव असल्यामुळे अनेक राज्यांनी मुळातच नवी पेन्शन योजना लागू केली नव्हती. काही राज्यांनी ती लागू केली व पुढे तो निर्णय रद्द करून जुनी पेन्शन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. या नव्या पेन्शन योजनेचे स्वरूप हे इतके विचित्र व भयकारक आहे की **केंद्र शासनाला सुद्धा २००४ मध्ये हा शासननिर्णय काढतांना संरक्षण दलातील अधिकारी व कर्मचारी, सैनिक व शिपाई यांना ही योजना लागू करण्याची हिंमत झाली नाही.** आजही तेथे ही योजना लागू नाही. सैन्य दलातील अधिकारी व सैनिक यांना नवी योजना लागू केली नाही हा अत्यंत उचित व योग्य निर्णय होय. यात काहीही शंका नाही, पण त्यातून पुढे घटनेच्या कलम १४ मधील समानतेच्या हक्काचा व भेदभावपूर्ण वागणुकीचा प्रश्न उपस्थित होतो. संरक्षण दलातील सैनिक आणि गृह विभागाच्या पोलीस दलातील शिपाई यांना असमान वागणूक देण्याचा मुद्दा असमानतेला जन्म देणारा होतो. धोरणात्मक निर्णय (मग तो कितीही वाईट असला तरी) घेण्याचा शासनाला अधिकारच आहे त्यामुळे न्यायालयात हा प्रश्न टिकणार नाही असे काही कायदेतज्ज्ञांचे मत आहे. जसजसे दिवस जातील तसतसा हा आक्रोश वाढत जाईल. त्यातुन पुढे हा प्रश्न कर्मचारी व शिक्षकांच्या संघटनातर्फे जनतेच्या न्यायालयात जाईल व तेथे तो निश्चित सुटेल. काही राज्यात तो प्रश्न या मार्गाने सुटलेला आहे ही मोठीच समाधानाची बाब आहे.

## *न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील*

**२८. न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील :** मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिलेल्या एका निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व स्तरावरच्या न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत नवी पेन्शन योजना रद्दबादल ठरविण्यात आलेली आहे. या सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा तपशीलवार निर्णय उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक १७ ऑगस्ट २०१७ रोजी सन २०१५ च्या याचिका क्रमांक १८८ मध्ये दिलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय हा सर्वोच्च न्यायालयाच्या दोन निर्णयांवर आधारित आहे. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले. :-

"18 Accordingly, We hold that : (i) the impugned

***महाराष्ट्रात नव्या पेन्शन योजनेतील कर्मचाऱ्यांची संख्या तीन लाखाच्या वर आहे. हीच संख्या भारताच्या पातळीवर ८० लाख असून त्यांच्यावर नुसत्या शासनाच्या १४ टक्के अंशदानाच्या रकमेचे आकडे पाहिले म्हणजे शासन स्वामित्वाधिकारित धनाचा केवढा मोठा प्रवाह धो धो करीत भांडवलदारांच्या घशात ओतला जात आहे हे दिसून येते.***

*(परिच्छेद ४२ पहा)*

**Government Resolution dated 31st October, 2005 is not applicable to the Judicial Officers in the State who were appointed on or after 1st November 2005.** The said officers will be entitled to the same pensionary benefits which are available to the judicial officers appointed before 1st November 2005. However, the judicial officers who are appointed on or after 1st November 2005 will have an option to continue under the New Scheme;" या निर्णयावर राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात केलेली विशेष अनुमती याचिका (SLP No. 31461/2017) मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

न्याय देण्याचे काम ज्यांच्याकडे आहे त्यांच्या बोडख्यावर शेअर मार्केट आधारित नवी पेन्शन योजना बसविणे हा मोठाच अन्याय म्हणावा लागेल. त्यामुळे न्यायिक अधिकाऱ्यांसाठी कोणत्या का मार्गाने होईना जुनीच पेन्शन योजना लागू राहीली हे योग्यच झाले; पण यातून घटनेच्या कलम १४ मधील समानतेच्या हक्काचा व भेदभावपूर्ण वागणुकीचा नवा प्रश्न उपस्थित होतो. मुंबई येथे 'सेशन जज्ज' म्हणून काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व त्या पदासाठीची पात्रता असलेल्या शासकीय विधी महाविद्यालयात काम करणाऱ्या 'प्रोफेसर' या पदधारकाला मात्र नवीन पेन्शन योजना, अमरावती येथे 'सेशन जज्ज' पदी काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू राहील मात्र त्या पदासाठीची पात्रता धारण करणाऱ्या अमरावती विद्यापीठातील 'प्रोफेसर' या पदधारकाला नवीन पेन्शन योजना असे या असमानतेचे स्वरूप असेल. धोरणात्मक निर्णय (मग तो कितीही वाईट असला तरी) घेण्याचा शासनाला अधिकारच आहे, त्यामुळे न्यायालयात हा प्रश्न टिकणार नाही असे काही कायदेतज्ज्ञांचे मत आहे. जसजसे दिवस जातील तसतसा हा आक्रोश वाढत जाईल. त्यातुन पुढे हा प्रश्न कर्मचारी व शिक्षकांच्या संघटनातर्फे जनतेच्या न्यायालयात जाईल व तेथे तो निश्चित सुटेल. काही राज्यात तो प्रश्न या मार्गाने सुटलेला आहे ही मोठीच समाधानाची बाब आहे.

## *घटनात्मक पदधारकांना जुनीच पेन्शन योजना लागू असेल*

**२९. घटनात्मक पदधारकांना जुनीच पेन्शन योजना लागू असेल :** भारतीय संविधानाने जी घटनात्मक पदे निर्माण केलेली आहेत त्या पदधारकांच्या सेवाशर्ती संसदेने केलेल्या किंवा राज्यविधानमंडळाने केलेल्या कायद्यांनी विहित केल्या जातील अशी घटनेतच तरतूद आहे. भारतीय संविधानाने निर्माण केलेली प्रमुख पदे म्हणजे भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश, केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य, संसदेच्या उभय सभागृहाचे पिठासीन अधिकारी, कंट्रोलर अँड ऑडिटर जनरल, राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचे सदस्य, राज्यविधानमंडळाच्या उभय सभागृहांचे पिठासीन अधिकारी, संसदेचे सदस्य व राज्यविधानमंडळाचे सदस्य या सर्व पदधारकांच्या करिता सेवानिवृत्ती वेतनाच्या व्यवस्था कायदा करून अस्तित्वात आलेल्या आहेत. या व्यवस्था काही बाबतीत जुन्या पेन्शन योजनेशी समतुल्य आहेत तर काहींच्या बाबतीत त्या जुन्या पेन्शन योजनेपेक्षा सरस आहेत. २००४ च्या पूर्वीच या व्यवस्था कायद्याने स्थापित झालेल्या आहेत व त्यानंतरसुद्धा त्या अस्तित्वात आहेत व कायद्यात बदल होत नाही तोवर त्या अस्तित्वात राहणार आहेत. **त्यामुळे राज्यकर्त्या वर्गापैकी घटनात्मक पदधारकांना नव्या पेन्शन योजनेमुळे कोणताही अपाय होईल अशी शक्यता नाही.** नवी दिल्ली येथे लोकसभा व राज्यसभेची अधिवेशने ज्या संसद भवनामध्ये होतात त्या संसदभवनातील सहाव्या क्रमांकाच्या लिफ्टजवळ आपण पोहचलो म्हणजे चाणाक्याच्या अर्थशास्त्रातील एक श्लोक तेथे आपल्याला दिसतो. तो पुढीलप्रमाणे:-

**"प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्**
**नात्मंप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्"**

*सहपत्र : एक (परिच्छेद ४१ पहा)*

राज्य अभिलेख देखभाल अभिकरण
राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना,
कुशेश मॅन्शन, पहिला मजला,
२२ कावसजी पटेल मार्ग, ४८ जन्मभूमी मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्र. ०२२-२२८२१३०७/२२८२१२४९ — Email- dd.dcps@mahakosh.in

क्रमांक : राअदेअ/माहिती अधिकार/विनायक चौधे/22/459 — दिनांक:-30/05/2022

प्रति,
श्री विनायक चौधे
अजनाड रावेर, जिल्हा-जळगाव
पीन — 425508

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबतचा अर्ज
अर्जदार — श्री विनायक चौधे

संदर्भ : 1) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,वित्त विभाग यांचेकडील पत्र क्रमांक माअअ-2022/प्र.क्र.52/सेवा-4, दिनांक 09/05/2022
२) आपला rtionline या शासनाच्या पोर्टलवर दाखल केलेला माहिती अधिकार अधिनियमा अंतर्गत दाखल केलेला अर्ज दिनांक 06/05/2022 या कार्यालयास प्राप्त दिनांक 18/05/22

महोदय,

आपला rtionline.maharashtra.gov.in या पोर्टल वर दाखल केलेला अर्ज जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,वित्त विभाग यांचेकडील पत्र क्रमांक माअअ-2022/प्र.क्र.52/सेवा-4, दिनांक 09/05/2022 (प्राप्त दिनांक 18/05/22) अन्वये माहिती अधिकार अधिनियम,2005 मधील कलम 6(3) अन्वये या कार्यालयास हस्तांतरीत केला आहे.

आपण प्रश्नार्थक स्वरूपात मागणी केलेली माहिती खालील प्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | माहिती |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्रातील नव्या पेंशन योजनेतील DCPS/NPS धारक एकूण कर्मचारी संख्या? | एकूण- 3,08,354 |
| 2 | DCPS/NPS योजनेत 10% कर्मचारी अंशदाना पोटी कर्मचारी वेतनातून दरमहा/ वर्षाला कपात रक्कम किती ? | वर्षाला एकूण - 1602,47,45,213.30 (1602.47 cr.) ( वर्ष-2021-22 ) |
| 3 | DCPS/NPS योजनेत 14% शासन अंशदान म्हणून दरमहा/ वार्षिक खर्च होणारी रक्कम किती ? ( मासिक /वार्षिक 14% शासन अंशदान खर्च रक्कम ) | वर्षाला एकूण - 2213,37,07,942.30 (2213.37 cr.) ( वर्ष- 2021-22 ) |
| 4 | महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांची NPS/DCPS योजनेतील आज अखेर जमा असलेली एकूण रक्कम किती ? ( कर्मचारी अंशदान + शासन अंशदान + व्याज/परतावा इत्यादीसह ) | कर्मचारी अंशदान - 9618,26,01,971.00<br>शासन अंशदान - 11170,47,35,662.00<br>एकूण अंशदान - 20788, 73,37,633.00<br>( 30 एप्रिल,22 अखेर पर्यंत ) |

सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास व या प्रकरणी आपणास अपिल करावयाचे असल्यास 30 दिवसांच्या आत "प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण" यांचेकडे सादर करावे.अपिलीय प्राधिकारी यांचा पत्ता-राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, कुशेश मॅन्शन, पहिला मजला, 22 कावसजी पटेल मार्ग, 48-जन्मभूमि मार्ग,फोर्ट, मुंबई-400001 व दुरध्वनी क्रमांक 022-22821307/22821249 असा आहे.

जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी
राज्य अभिलेख देखभाल अभिकरण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

अर्थ असा की, लोकांच्या हितामध्ये राज्यकर्त्यांचे हित सामावलेले असते. प्रजा सुखी असण्यातच राजाचे सुख सामावलेले असते. राज्यकर्त्यांनी केवळ आपल्या सुखाचा व आपल्याच हिताचा विचार करू नये तर प्रजाजनांच्या हितामध्ये व सुखामध्ये आपले हित व आपले सुख समाविष्ट असते असाच विचार केला पाहिजे. घटनात्मक पदधारक या महावस्त्रासह सर्व सत्ताधारक श्रेष्ठजन जुनी पेन्शन योजना हितकारक असल्यामुळे त्या योजनेचा सुखोपभोग घेतांना आपल्या सर्व सेवकांना मात्र नव्या पेन्शन योजनेच्या गर्तेत ढकलून देत असतील तर "प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्" हा सिद्धांत सांगणारी संसद भवनातील पाटी काढून टाकावी लागेल. **लोक उदासीन असतील तरच व तोपर्यंतच अशा राज्यकर्त्यांना सुखासीन राहता येते हा सिद्धांतसुद्धा राज्यकर्त्यांना विसरता येणार नाही. शिवाय जे शासन आपल्या सेवकांना सुखात ठेवू शकत नाही ते प्रजेच्या सुखाचा काय विचार करणार? असा विचार लोक करणारच नाहीत असे गृहीत धरणे खूपच धोक्याचे आहे.** राज्यकर्त्यांनी आपल्याच सेवकांचे उत्तर आयुष्य 'म्युच्युअल फंड' सदृश 'पेन्शन फंड' या फंडाच्या हवाली करावे ही बाब अत्यंत चुकीची आहे, असे ठामपणे कोणीतरी सांगण्याची वेळ आलेली आहे आणि ते काम कर्मचारी व शिक्षकांच्या संघटनांनाच करावे लागणार आहे. जनतेच्या न्यायालयात हा प्रश्न नेऊन त्यांनी ते काम सुरू केलेले आहे. त्याबाबतीत काही राज्यात त्यांना उत्तम यशही मिळालेले आहे.

### THE PENSION FUND REGULATORY AND DEVELOPMENT AUTHORITY ACT

**३०.** नवीन पेन्शन योजनेच्या प्रचालनासाठी "The Pension Fund Regulatory and Development Authority Act" *('निवृत्तीवेतन निधी नियामक व विकास प्राधिकरण' यापुढे उल्लेख 'प्राधिकरण' असा)* या नावाचा एक कायदा केंद्रशासनाने केला असून या कायद्याचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास निवृत्तीवेतनधारकांना क्रौर्यपूर्ण व निर्दयीपणे वागणूक देणारा कायदा असेच त्याचे वर्णन करता येईल.

### *निवृत्तीवेतनधारक हा शब्द कायमचा इतिहास जमा होईल*

**३१.** नवीन पेन्शन योजनेमुळे निवृत्तीवेतनधारक हा शब्द कायमचा इतिहासजमा होईल. या कायद्यामध्ये Pension Fund, Pension Regulatory, Pension System, National Pension System असे शब्द अनेक ठिकाणी वापरण्यात आलेले असले तरी Pensioner हा शब्द या संपूर्ण कायद्यामध्ये एकाही ठिकाणी वापरण्यात आलेला नाही, कोठेही नाही. आपण ज्याला निवृत्तीवेतनधारक म्हणतो त्याला या कायद्याने 'वर्गणीदार' असे संबोधिले असून दुसऱ्या कलमामध्ये त्याची व्याख्या नमूद करण्यात आलेली आहे. :- "(t) "subscriber" includes a person who subscribes to a scheme of a pension fund;" *(Section 2 (t))* नाही म्हणायला एखाद दुसऱ्या ठिकाणी Individual Pension Account असे शब्द वापरण्यात आलेले आहेत. पण केवळ तेवढ्यावरून आपण Pensioner आहोत असा कोणाचाही गैरसमज होऊ नये म्हणून त्याची सुद्धा व्याख्या Section 2 (e) मध्ये देण्यात आलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"(e) "individual pension account" means an account of a **subscriber,** executed by a contract setting out the terms and conditions under the National Pension System;" *(Section 2 (e))* नवीन पेन्शन योजनेतील करारानुसार बांधिल झालेल्या 'वर्गणीदाराचे खाते' असे हे वर्णन आहे.

### *मध्यस्थांचा सुळसुळाट*

**३२. मध्यस्थांचा सुळसुळाट :** नवीन पेन्शन योजनेमध्ये हे प्राधिकरण पेन्शन देईल अशाप्रकारचा एक समज काही लोकांच्या मनामध्ये असलेला दिसून येतो, तो खरा नाही. कायद्याच्या कलम ३(२) मध्ये "to acquire, hold and dispose of property, both movable and immovable, and to contract हे या प्राधिकरणाचे प्रमुख काम असेल. वर्गणीदारांना जे काही लाभ द्यावयाचे आहे ते लाभ देण्याची जबाबदारी ही मध्यस्थ्यांवर सोपविण्यात आलेली आहे. या मध्यस्थामध्ये कोणाकोणाचा समावेश असेल हेही कायद्यामध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

"(g) "intermediary" includes
pension fund,
central recordkeeping agency,
National Pension System Trust,
pension fund adviser,
retirement adviser,
point of presence
and such other person or entity
connected with collection, management, recordkeeping and **distribution of accumulations;"** *(Section 2 (g))*

*सहपत्र : दोन (परिच्छेद ४२ पहा)*

## देश हित NPS में है या OPS में ?

आइए समझते हैं।

पूरे देश में लगभग 80 लाख सरकारी कर्मचारी हैं।

| NPS | OPS |
|---|---|
| NPS में सरकार को 14% धनराशि (औसतन 15000/- रूपये प्रति कर्मचारी प्रतिमाह के हिसाब से 180 अरब रूपये प्रतिमाह) प्राइवेट कंपनियों को प्रति माह जमा करनी पड़ती है। ☆ जो कि सरकार वर्तमान में दे रही है। | OPS में सरकार इस धनराशि का प्रयोग राष्ट्र निर्माण के लिए कर सकती है। |
| NPS की धनराशि से प्राइवेट कंपनी अपनी नेटवर्थ बढ़ाएंगी। | OPS धनराशि का प्रयोग राष्ट्र निर्माण तथा देश के नागरिकों की तरक्की के लिए होगा। |
| सरकार, देश व कर्मचारी सभी को नुकसान होगा । | यदि इस धनराशि को 7% ब्याज की दर से 30 वर्ष (कर्मचारी का औसत सेवाकाल) तक सरकार अपने पास रखे तो 30 वर्ष बाद इसी मद से सरकार के पास कुल 505,532,657,526,122/- रूपये होंगे। |
| कर्मचारी को मात्र 1000 से 5000 के बीच पेंशन मिलेगी और सरकार व देश को किसी प्रकार का कोई लाभ नहीं मिलेगा। | सरकार के पास जमा धनराशि से 80 लाख कर्मचारियों को 1,00,000/- रूपये प्रतिमाह से शुरू करके तथा 10% प्रतिवर्ष बढोतरी करते हुए 30 वर्ष (कर्मचारियों की 92 वर्ष की आयु) तक पेंशन देने के बाद भी 803,408,760,222,672/- रूपये सरकार के पास बचे रह जाएंगे। |

☆ केवल अंधभक्ति के आधार पर नहीं बल्कि आंकड़ो के आधार पर देश हित में आप स्वयं निर्णय लीजिए कि NPS देश के लिए हितकारी है या OPS ?

या कायद्याचे कलम 2 (g) हे वर शब्दशः उधृत केलेले आहे. यात पहिला मध्यस्थ म्हणून '**पेन्शन फंड**' असा उल्लेख आहे. जसा Mutual Fund असतो तसा हा '**पेन्शन फंड**' असेल व आपण त्याचे वर्गणीदार असू. या कायद्याच्या कलम २७ प्रमाणे नोंदणी करून प्रत्येक मध्यस्थाला त्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल. **Such other person or entity** असा शेवटचा 'मध्यस्थ' असून Person या शब्दाचा अर्थ शासनाच्या पसंतीचा व त्यांनी प्रमाणपत्र देऊन नोंदणी झालेला भांडवलदार व Entity या शब्दाचा अर्थ शासनाच्या पसंतीची प्रमाणपत्रधारक नोंदबद्ध कंपनी किंवा कंपन्या असा आहे. "Collection, management, recordkeeping and **distribution of accumulations;"** हे या मध्यस्थांचे मुख्य काम असेल.

### *पेन्शन फंडांचा सुळसुळाट*

**३ ३ . पेन्शन फंडांचा सुळसुळाट :** आज बाजारात जसे अनेक 'म्युच्युअल फंड' उपलब्ध आहेत तसे या नव्या पेन्शन योजनेप्रमाणे अनेक 'पेन्शन फंड' वर्गणीदारांना उपलब्ध होतील. एका किंवा काही व्यक्तींना 'पेन्शन फंड' म्हणून काम करता येईल. मात्र त्यासाठी त्यांना प्राधिकरणाकडून नोंदणीचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल. वर्गणीदाराकडून आलेली वर्गणी स्वीकारणे, ती पेन्शन फंडात एकत्र करणे व त्यावरील लाभ (Payments) वर्गणीदारांना वितरित करणे हे या फंडाचे मुख्य काम असेल. अशी स्पष्ट तरतूद या कायद्याच्या कलम २३ मध्ये आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"23.Pension funds. - (1)** The Authority may, by granting a certificate of registration under sub-section (3) of section 27, permit **one or more persons to act as a pension fund for the purpose of receiving contributions, accumulating them and making payments to the subscriber** in such manner as may be specified by regulations. **(2)** The number of pension funds shall be determined by regulations and the Authority may, in public interest, vary the number of pension funds"

### *निवृत्तीवेतन किती मिळेल? याबाबतची कोणतीही खात्री नाही*

**३ ४ . निश्चित निवृत्तीवेतन किती मिळेल? याबाबतची कोणतीही खात्री नाही :** जुन्या पेन्शन योजनेमध्ये निवृत्त होत असताना प्रत्येक व्यक्तीला आपल्याला किती निवृत्तीवेतन मिळेल याची निश्चित खात्री असते. सेवानिवृत्त होत असताना जी वित्तलब्धी असेल त्याच्या ५० टक्के मूळ निवृत्तीवेतन निश्चित होत असे. **नवीन पेन्शन योजनेमध्ये किती निवृत्तीवेतन मिळेल याचे कोणतेही गर्भित किंवा सुव्यक्त आश्वासन समाविष्ट नाही.** वर्गणीदाराच्या वतीने बाजारात जी काही गुंतवणूक होईल त्यावरील लाभ त्याला मिळतील असे स्पष्टपणे कायद्याच्या कलम 20 (2) (g) मध्ये नमूद आहे. ते पुढीलप्रमाणे:-

"(g) there shall not be any implicit or explicit assurance of benefits except market based guarantee mechanism to be purchased by the subscriber;" *(Section 20 (2) (g))*

या कलमाची चर्चा करतांना आपल्याला समजावे म्हणून व ओळखीचा म्हणून 'निवृत्तीवेतन' असा शब्द वापरलेला आहे. या कायद्यात त्यांचे वर्णन **"distribution of accumulations"** असे केलेले आहे. त्याला आपण आपल्या समाधानासाठी 'निवृत्तीवेतन' असे म्हणावयाचे असल्यास तो भाग वेगळा.

### *शासनाकडे कोणतीही तक्रार करता येणार नाही*

**३ ५ . शासनाकडे कोणतीही तक्रार करता येणार नाही :** निवृत्तीवेतनाच्या बाबतीत कोणतीही तक्रार असेल तर आज ती निवृत्तीवेतनधारकाला शासनाकडे करता येते. या नव्या योजनेप्रमाणे यापुढे याबाबतची कोणतीही तक्रार शासनाकडे करण्याचा मार्ग या कायद्याने पूर्णपणे बंद केलेला आहे. मध्यस्थाने कायदा, नियम, विनियम, निदेश याप्रमाणे कृती केली नसेल तर त्याबाबतची तक्रार प्राधिकरणाने नेमलेल्या अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे (Adjudicating Officer) करावी लागेल. त्या अधिकाऱ्याची शिफारस लक्षात घेऊन मध्यस्थाला दंड करण्याचा अधिकार प्राधिकरणाला असेल. इतकेच नव्हे तर त्या मध्यस्थाला "मध्यस्थ" म्हणून दिलेले प्रमाणपत्र रद्द करण्याचा सुद्धा अधिकार प्राधिकरणाला असेल. **अशी स्पष्ट तरतूद या कायद्याच्या कलम ३० मध्ये आहे.**

अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाने समाधान न झालेल्या वर्गणीदाराला प्राधिकरणाकडे संरक्षणार्थ अंतरिम आदेश मिळविण्यासाठी अर्ज करता येईल. हा अर्ज लक्षात घेऊन मध्यस्थाची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार सुद्धा कलम ३१ प्रमाणे प्राधिकरणाला असेल. मध्यस्थाला किंवा मध्यस्थाच्या प्रशासक मंडळाला किंवा बोर्ड ऑफ डायरेक्टर्सला निष्प्रभावित (supersede) करण्याचा अधिकारसुद्धा प्राधिकरणाला असेल **अशाप्रकारची तरतूद या कायद्याच्या कलम ३१ (२) मध्ये आहे.**

अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या व प्राधिकरणाच्या निर्णयाने समाधान न झालेल्या वर्गणीदाराला ४५ दिवसात दुसऱ्या एका कायद्याने नेमलेल्या रोखे पुनर्निणय न्यायाधिकरणाकडे (Securities Appellate Tribunal) अपिल करता येईल **अशी या कायद्याच्या कलम ३६ मध्ये तरतूद आहे.**

त्या न्यायाधिकरणाच्या निर्णयाने समाधान न झालेल्या वर्गणीदाराला ६० दिवसाच्या आत थेट सर्वोच्च न्यायालयात जाता येईल अशी **सुविधा या कायद्याच्या कलम ३८ अन्वये वर्गणीदाराला उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.**

### *वृद्धापकाळात कोर्टकचेऱ्यांचे हेलपाटे*

**३ ६ .** सारांश काय तर सेवानिवृत्त लोकांच्या तक्रारी व निवेदने ऐकण्यात शासनकर्त्यांचा कितीतरी वेळ वाया जात होता. त्यामुळे आता 'निवृत्तीवेतनधारक' हे पद गमावून बसलेल्या आणि 'वर्गणीदार' या पदावर बढती मिळालेल्या या व्यक्तीने आपला सेवानिवृत्तीनंतरचा वेळ वाया घालवू नये तर प्रथम अभिनिर्णय अधिकारी, त्यानंतर प्राधिकरण, त्यानंतर न्यायाधिकरण, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हेलपाटे घालण्याच्या कामी हा वेळ खर्च करावा अशी सुविधा या नव्या पेन्शन योजनेच्या कायद्याने उपलब्ध करून दिलेली आहे. **उभी हयात ज्या कर्मचाऱ्याने शासनाची सेवा केली त्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी "आता तुझा-आमचा काही संबंध राहीला नाही. पुन्हा इकडे यायचे नाही" असे सुनावणाऱ्या शासनकर्त्यांच्या न्यायबुद्धीची व दयाबुद्धीची करावी तेवढी प्रशंसा थोडीच आहे.**

### *मतदानाच्या माध्यमातून सुद्धा न्याय*

**३ ७ .** व्यावसायिक जीवन संकटात आणणारा जीवन-मरणाचा प्रश्न समोर उभा ठाकतो तेव्हा त्या प्रश्नावर आपले मत लक्षात घ्यावे म्हणून कायद्याच्या कसोटीवर जो प्रश्न न्यायालयात नेता येत नाही किंवा येणार नाही असा कायदेशीर सल्ला मिळतो किंवा मिळाला असेल तर मग व्यावसायिक संघटनांच्या समोर आंदोलनाचा मार्ग हाच एक उपाय असतो. आंदोलनाच्या मार्गाने जायचे झाल्यास खूप मेहनत, खूप बांधणी व मजबुतीने त्या आंदोलनाची तयारी करावी लागते व त्या माध्यमातून आपले मत प्रभावित करण्यासाठी एखाद्या वेळी बराच विलंबसुद्धा लागू शकतो. अशा वेळेला लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला आपले मत प्रभावीपणे समोर नेता येते. **मतदानाच्या माध्यमातून सुद्धा न्याय** मिळविल्याची अनेक उदाहरणे इतिहासात नमूद आहे. अशा मतदानात एक महत्त्वपूर्ण अडचण अशी असते की, पूर्वपक्ष व उत्तरपक्ष यांच्या भूमिका ठाम नसतील व उभयपक्ष मोघम शब्दात भूमिका घेत असतील तर मतदारांचा गोंधळ होतो.

### *व्यावसायिक संघटनांचे धोरण*

**३ ८ .** निवडणुकीमध्ये जुन्या पेन्शन योजनेच्या ठामपणे विरोधात व ठामपणे बाजूने असलेल्या पक्षांत ही निवडणूक होत असल्यास मतदारांना आपले मत निर्धारपूर्वक व्यक्त करणे सोपे होते. **व्यावसायिक संघटनांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी ठेवू नये किंवा बांधील राहू नये हे जेवढे खरे तेवढेच आपल्या व्यावसायिक जीवनावर होणारे आघात परतवून लावण्याच्या प्रयत्नात ठाम आधार देणाऱ्या पक्षाला पाठिंबा व कुठाराघात करणाऱ्या पक्षाला विरोध करण्याचे धैर्य दाखविण्यात कमी पडू नये हेही तेवढेच खरे.**

### *राजकीय पक्ष व पक्षांचे धोरण*

**३ ९ .** राजकीय पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला ज्यावेळी आपण मतदान करतो त्यावेळी तो उमेदवार त्या राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणाला बांधील

**"(g) there shall not be any implicit or explicit assurance of benefits except market based guarantee mechanism to be purchased by the subscriber;" *(Section 20 (2) (g))***

*(See Para 34 of the Article)*

**"Implementation of old pension scheme will not result in deduction of even a single rupee from development expenditure of the state and welfare of its people."**

*(See Para 22)*

असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

### *जुनी पेन्शन योजना पुनरुज्जीवित करणारे शासननिर्णय*

**४०.** जुनी पेन्शन योजना अनेक राज्यात सुरू झालेली आहे. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, छत्तीसगड, पंजाब, राजस्थान, झारखंड या राज्यांनी याबाबतचे शासननिर्णय निर्गमित केलेले असून तेथे जुनी पेन्शन योजना प्रत्यक्ष सुरू झालेली आहे. छत्तीसगड शासनाचा शासननिर्णय त्यांच्या राजपत्रात प्रकाशित झाला असून तो सन २०२२ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ १२९ वर प्रसृत केलेला आहे. त्याच वर्षाच्या बुलेटीनमध्ये पंजाब शासनाचा शासननिर्णय पृष्ठ २८९ वर व राजस्थान शासनाचा अधिकृत निर्णय पृष्ठ १३४ वर प्रसृत केलेला आहे. www.nuta.in या संकेतस्थळावरून हे शासननिर्णय कोणालाही चटकन उपलब्ध होतील.

### *१० टक्के व १४ टक्केचा हिशेब*

**४१.** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी अत्यंत मेहनतीने या चळवळीची बांधणी केलेली आहे. प्राधिकरण कायद्याच्या कलम २१ अन्वये मध्यवर्ती अभिलेख देखभाल अधिकरण (Central Record Keeping Agency) निर्माण करण्यात आले आहे. या अधिकरणाच्या महाराष्ट्र शाखेकडून जुनी पेन्शन संघटनेचे नेते श्री.विनायक चौथे यांनी माहितीच्या अधिकारात अत्यंत उपयुक्त माहिती मिळविलेली आहे. महाराष्ट्र राज्यात NPS मध्ये ३,०८,३५४ कर्मचारी आहेत असे या अधिकृत माहितीत नमूद आहे. सन २०२१-२२ या **एका वर्षात कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या १० टक्के अंशदानापोटी १६०२.४७ कोटी रुपये व १४ टक्के शासनाच्या अंशदानापोटी २२१३.३७ कोटी रुपये अधिकरणाकडे जमा झाल्याचे दिसून येते.** आजपावतो एकूण किती रक्कम जमा झाली याचे आकडे विस्मयचकित करणारे आहेत. राज्य अभिलेख देखभाल अधिकरण यांचे ३० मे २०२२ रोजीचे हे पत्र जुनी पेन्शन संघटनेने प्रसारित केले असून ते सोबत **सहपत्र : एक** म्हणून प्रसृत केलेले आहे. आकड्यांची बिनचुकता पदरी पडावी म्हणून हे पत्र फोटो पद्धतीने मुद्रित केलेले आहे. **ही एवढी मोठी धनराशी भांडवलदारांच्या ताब्यात द्यावयाची व त्यांनी पेन्शन फंडांच्या माध्यमातून ते पैसे बाजारात गुंतवायचे व पुढे तुटपुंजा मोबदला वर्गणीदारांना द्यायचा असे हे गणित आहे.**

### *फक्त १४ टक्केचा हिशेब*

**४२.** अधिकृत आकडेवारीनुसार महाराष्ट्रात **नव्या पेन्शन योजनेतील कर्मचाऱ्यांची संख्या तीन लाखाच्या वर आहे. हीच संख्या भारताच्या पातळीवर ८० लाख असून त्यांच्यावर नुसत्या शासनाच्या १४ टक्के अंशदानाच्या रकमेचे आकडे पाहिले म्हणजे शासन स्वामित्वाधिकारित धनाचा केवढा मोठा प्रवाह धो धो करीत भांडवलदारांच्या घशात ओतला जात आहे हे दिसून येते. "देश हित NPS में है या OPS में?"**या मथळ्याखालील पत्रकात याबाबतची आकडेवारी प्रकाशित करण्यात आली असून ते पत्रक सोबत **सहपत्र : दोन** म्हणून प्रसृत केलेले आहे. आकड्यांची बिनचुकता पदरी पडावी म्हणून हे पत्र फोटो पद्धतीने मुद्रित केलेले आहे.

### *अखिल भारतीय स्तरावर मोर्चेबांधणी*

**४३.** "भांडवलदारांचे घरभरणे व कर्मचाऱ्याला भिकेला लावणे" अशा या नव्या पेन्शन योजनेच्या अंगभूत वैशिष्ट्यामुळे अखिल भारतीय स्तरावरून या योजनेला हाणून पाडण्यासाठी जबरदस्त मोर्चेबांधणी सुरू झालेली आहे. दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी दिल्ली येथील तालकोटरा मैदानात केंद्रशासन, राज्यशासन तसेच शिक्षकांचे प्रतिनिधी यांचे एक संयुक्त राष्ट्रीय अधिवेशन पार पडले असून या अधिवेशनाने एक घोषणापत्र (Declaration) जाहीर केले आहे. त्या घोषणापत्रातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे. :-

"We, the Employees and Teachers working under Central/State govts, assembled at the call of the All India State Government Employees Federation and Confederation of Central Government Employees & Workers, resolved to strengthen our United struggle to protect the hard earned rights of Central/State Employees and Teachers."

या घोषणापत्रात पहिलीच मागणी "Annul PFRDA Act; Scrap NPS" ही असून संघर्षाचा कृतिकार्यक्रम सुद्धा घोषित करण्यात आला आहे.

**४४.** आमच्या घटनाकारांनी काही महत्त्वाचे सामाजिक व राजकीय हक्क घटनेच्या 'मूलभूत हक्क' या तिसऱ्या भागात नमूद केलेले आहेत. समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, सांवैधानिक उपाय योजण्याचा हक्क, या प्रमुख मूलभूत हक्कांचा यासंदर्भात उल्लेख करता येईल. या मूलभूत हक्कांची न्यायालयात जाऊन अंमलबजावणी करवून घेता येते.

**४५.** शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनाचे खात्रीलायक संभाव्य आकारमान त्यावेळी उपलब्ध नसल्याने तसेच जे उपलब्ध होते ते पुरेसे नसल्याने व जर न्यायालयामार्फत अंमलबजावणी करून घेता येत नसेल तर त्या आर्थिक अधिकारांना मूलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट करणे निरर्थक असल्याने या आर्थिक अधिकारांचा उल्लेख घटनाकारांनी घटनेच्या "राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे" या चौथ्या भागात केला. "भावी काळातील केंद्र व राज्य विधानमंडळांना तसेच केंद्र व राज्याच्या मंत्री मंडळांना या संविधानाने दिलेले अधिकार त्यांनी कशारीतीने वापरावेत याबाबत त्यांना घटनासमितीने दिलेले हे निदेश आहेत" अशा शब्दात या राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीमध्ये विशद केले होते. पुनरुक्तीचा दोष पत्करून ते शब्द मी जसेच्या तसे उधृत करीत आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"With regard to the word "directive" I think it is necessary and important that the word should be retained because it is to be understood that in enacting this part of the constitution the **Constituent Assembly, as I said, is giving certain directions to the future legislature and the future executive to show in what manner they are to exercise the legislative and executive power which they will have."** *(Constitution Assembly Debates Vol. 7 Page 476)*

**४६.** स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या ७५ वर्षात पाच आर्थिक अधिकारांना "कायदेशीर आर्थिक अधिकार" असे स्थान मिळायला पाहिजे होते त्याबाबत केंद्राच्या व राज्याच्या कायदेमंडळांनी व मंत्रिमंडळांनी काय प्रगती केली? याचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

घटनेच्या कलम ४३ मध्ये नमूद केलेला रोजगारक्षम व्यक्तींना कामाचा हक्क देण्यास कायदेशीर हक्क म्हणून ग्रामीण रोजगाराची हमी देणारा कायदा झाला. Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act, 2005 या कायद्यामुळे त्याबाबतीत थोडीतरी प्रगती झाली. शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यात शिक्षण हक्काचा कायदा (Right to Education Act) या कायद्याने, आरोग्याच्या बाबतीत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान २००५ (National Health Mission 2005) या अभियानामुळे, खाद्यान्न उपलब्धतेच्या बाबतीत अन्न सुरक्षेचा कायदा (National Food Security Act) व त्या अंतर्गत येणारी प्रधानमंत्री गरीब अन्न कल्याण योजना, (PMGKAY) यामुळे

***या मधल्या काळात सेवानिवृत्त झालेल्या २७०१ व्यक्तींपैकी २११८ व्यक्तींचे तपशील माहितीच्या अधिकारात अधिकृतपणे मिळविण्यात आलेले आहेत. त्यात असे आढळून आले की, १२ व्यक्तींना मिळालेले निवृत्तीवेतन हे ५०० रुपयांपेक्षा कमी होते. गंगानगर जिल्ह्यातील निर्मला शर्मा या सेवानिवृत्त व्यक्तीला दरमहा १४८.१७ रुपये पेन्शन निश्चित झाले.***

*(परिच्छेद २२ पहा)*

***जे शासन आपल्या सेवकांना सुखात ठेवू शकत नाही ते प्रजेच्या सुखाचा काय विचार करणार? असा विचार लोक करणारच नाहीत, असे गृहीत धरणे खूपच धोक्याचे आहे.*** (परिच्छेद २१ पहा)

फारशी समाधानकारक नसली तरी थोडीफार प्रगती झालीच हे नाकारता येणार नाही.

**४७.** वार्धक्यावस्थेत शासनाचे साहाय्य मिळण्याचा (घटनेचे कलम ४१) कायदेशीर अधिकार प्राप्त होण्याच्या प्रश्नाची प्रगती काय आहे? तर सर्वांना तो अधिकार मिळणे तर दूरच राहीले, पण जुनी पेन्शन योजना उद्ध्वस्त करून स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेला हा कायदेशीर अधिकार संपुष्टात आणला जात आहे. हा प्रश्न जनतेच्या न्यायालयात नेल्याशिवाय सुटणार नाही अशी ठाम समजूत पुढे आलेली आहे.

### *हिमाचल मध्ये काय घडले?*

**४८.** नवीन पेन्शन योजनेला मातीत घालून जुनी पेन्शन योजना पुनरुज्जीवित करण्यासाठी देशभरातील संघटनांनी कंबर कसलेली दिसून येते. शासन स्वामित्वाधिकारित धनाचा प्रवाह भांडवलदारांच्या घशात घालून कर्मचाऱ्यांना नागडे करण्याच्या प्रयत्नाला हाणून पाडण्यात 'निवडणुकीतील लोकशक्ती' किती प्रभावी असते हे हिमाचल प्रदेशात दिसून आले. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) बैठकीच्या निमित्ताने हिमाचल प्रदेशातील राष्ट्रीय कार्यकारिणीच्या काही सदस्यांशी झालेल्या चर्चेतून त्यांनी ही मोहीम कशी पार पाडली याची जी माहिती मिळाली ती पुढीलप्रमाणेः-

(१) सर्व संघटनांनी एकत्र येऊन केंद्रीय पातळीवर एक त्यांची समन्वय समिती स्थापन केली. (२) संघटनांच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी विभागीय स्तरावर, विभागीय स्तराच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा स्तरावर व जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी तालुका स्तरावर सभा घेऊन मुख्य मुद्यांची माहिती करून दिली. (३) नव्या योजनेतील क्रौर्य उघड करून दाखविणाऱ्या व तपशीलवार माहिती देणाऱ्या वक्त्यांची त्यांनी एक यादी तयार केली. (४) त्यानंतर प्रत्येक शहरामध्ये, नगरामध्ये, खेड्यामध्ये सभांच्या आयोजनाचा धडाका लावला. (५) **या सभांमध्ये बहुसंख्य लोक व काही ठिकाणी तर सर्वच लोक ज्यांचा पेन्शन योजनेशी काही संबंध नाही असेच असत.** (६) "वार्धक्यावस्थेत प्रत्येक माणसाला सरकारी साहाय्य मिळण्याचा अधिकार" या भारतीय संविधानाच्या ४१ व्या कलमातील तरतुदीनुसार तसा कायदेशीर आर्थिक अधिकार अंमलात आणण्यासाठी शासन काहीच करीत नाही आणि ब्रिटिशकाळापासून चालत आलेला 'कायदेशीर आर्थिक अधिकार' असे स्वरूप असलेली आमची जुनी पेन्शन योजना उद्ध्वस्त करीत आहे, हा त्यांचा प्रचारातील प्रमुख असा पहिला मुद्दा राहत असे. (७) तेवढाच दुसरा प्रमुख मुद्दा नव्या पेन्शन योजनेतील क्रौर्याचा राहत असे. आयुष्यभर सेवा केलेल्या कर्मचाऱ्याला निवृत्तीनंतर एखाद्या खाजगी कंपनीने उभ्या केलेल्या फंडात वर्गणीदार म्हणून जमा केलेल्या रकमेच्या व्याजावर उदरनिर्वाह करावा लागणार आहे हे सभेतील लोकांना खरे वाटत नसे. (८) सभेतील चार सुशिक्षित लोकांना प्राधिकरणाच्या कायद्यातील तरतुदी आम्ही सभेत वाचायला लावत असू किंवा आम्ही वाचत असू. ते ऐकून सभेतील लोकांना आश्चर्य वाटत असे. त्या लोकांना आणखी आश्चर्य याचे वाटत असे की, त्या खाजगी भांडवलदार कंपनीने उभ्या केलेल्या फंडात सरकार १४ टक्के अंशदान देणार आहे. (९) दिवस कमी असल्यामुळे आमच्या एकावेळी अनेक ठिकाणी सभा सुरू असत. उमेदवार व राजकीय पक्षाच्या सभा ते त्यांच्या वेगळ्या घेत. (१०) आमच्या सभांची व्यवस्था आमची आम्ही करत असू.

**४९.** आमजनतेच्या समोर हा प्रश्न न्यायचा असेल तर त्यासाठी मजबूत तयारी करावी लागेल. त्यासाठी सभा, बैठका, संमेलने, मोर्चे यांच्या माध्यमातून भरभक्कम मेहनत घ्यावी लागेल. जुनी पेन्शन संघटनेने नागपूर येथे आयोजित केलेल्या मोर्चामध्ये नुटाच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांसह शिक्षकांचा मोठ्या संख्येत सहभाग होता. नुटाच्या आमसभेने याबाबत धोरणात्मक ठराव मंजूर केलेला असून त्यादृष्टीने नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी गेले वर्षभर बरीच मेहनत केलेली आहे. केवळ नुटाच्या क्षेत्रात संघर्ष उभा करण्याचा हा विषय नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने सुद्धा याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला असून महासंघाच्या घटक संघटनांनी त्याबाबतची बांधणी सुरू केलेली आहे. जुनी पेन्शन संघटनेने याबाबतीत उभे केलेले आंदोलन लक्षात घेऊन या प्रश्नाशी संबंधित सर्व संघटनांशी संपर्क व सहकार्य महत्त्वाचे असेल.

हिमाचल प्रदेश मंत्रिमंडळाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याच्या बातमीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, पण त्याच दिवशी मंत्रिमंडळाने या कामी शासन स्वामित्वाधिकारित धनामध्ये वृद्धी करण्याची लहानशी योजनासुद्धा मंजूर केली. त्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. **शेवटी काय तर जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा राज्यकर्त्यांनी शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहनाला योग्य वळण देण्या न देण्याचाच प्रश्न आहे.**

*****

No. Fin.(Pen)A(3)-1/2023
**GOVERNMENT OF HIMACHAL PRADESH**
**FINANCE (PENSION) DEPARTMENT**
Dated: Shimla-171002, **the 17th January, 2023**

**OFFICE MEMORANDUM**

The Undersigned is directed to say that the Cabinet in its meeting dated 13.1.2023 has decided as under:

"All Government employees who are presently being covered under the defined Contributory Pension Scheme also referred to as National Pension System (NPS) **will be given benefit of Old Pension Scheme (OPS).** The Finance Department is directed to notify instructions/Standard Operating Procedure (SOP) to implement the decision."

In pursuance to Cabinet decision above, the Finance Department will issue terms and conditions and standing operating procedure in due course of time.

By Order
**Chief Secretary**
to the Government of Himachal Pradesh.

**Just these two taxes, in short, and that too levied only on the top 1 per cent, would be quite enough to fetch more than Rs 12 lakh crore.** *(See Para 23)*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2021-23 (Uploaded on www.nuta.in on 30.01.2023) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.02.2023**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,............................................................

..................................................................

..................................................................

..................................................................